# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price ₹ 3/-

# संवाद

।। स्वयमेव मृगेंद्रता ।।

मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।
साद्रासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।

**Vol.-5** **Issue - 5** नोव्हेंबर - 2012 **November 2012**


## संपादकीय

प्रिय सभासद मित्रांनो,

प्रत्येक माणसाला आपल्या आयुष्यात विविध प्रकारच्या सुख-दु:खांना सतत सामोरे जावे लागते. निव्वळ सुख किंवा निव्वळ दु:ख कायमचं सहसा कोणाच्याच वाटेला येत नाही. म्हणूनच आपलं जीवन म्हणजे सुख-दु:खांच्या पाठशिवणीचा खेळ आहे असं म्हटलं जातं. सुखाने माणूस आनंदून जातो तर दु:खाने तो कष्टी होतो. मात्र त्याने सुखाने हुरळून जाऊ नये आणि दु:खाने खचूनही जाऊ नये ही आपल्या संतांची शिकवणच आपल्याला यशस्वी जीवनाचा मार्ग दाखविते.

आपल्या व्यक्तिगत जीवनामध्ये आपणास अनेक समस्यांना-संकटांना सामोरे जावे लागते त्याचप्रमाणे आपल्या सार्वजनिक जीवनात देखील आपण अनेक समस्यांना सामोरे जात असतो. त्यासाठी जर सर्व समाजघटक एकत्रित झाले तर त्या सामुदायिक प्रयत्नांनीच सार्वजनिक किंवा समाजाला भेडसावणाऱ्या समस्यांवर-संकटांवर आपण यशस्वीपणे मात करू शकतो.

आजच्या काळात साऱ्या समाजाला त्याच्या दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या अनेक समस्यांपैकी सार्वजनिक वाहतुक-व्यवस्था ही एक प्रमुख समस्या असून ती आज देशातल्या अनेक शहरातून वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेली आहे. त्यातूनच पर्यावरण ऱ्हास व अनेक प्रकारच्या प्रदूषणाच्या आरोग्यविघातक समस्याही उत्पन्न झालेल्या आहेत. या समस्येचं गंभीर व घातक स्वरूप लक्षात घेऊन ती तात्काळ सुटावी असंच प्रत्येकाला मनोमन वाटत असतं. ही गोष्ट नेमकी हेरून या समस्येच्या सोडवणुकीसाठी शहरातील सर्व समाजघटकांना एकत्र करण्याचं, एकजीव एकवटण्याचं महान कार्य पुणे शहरात-पुण्यनगरीत- नुकतंच पार पडलं आणि या निमित्ताने अन्य शहरांपुढे आदर्श घातला गेला. या ऐतिहासिक घटनेकडेच आम्ही वाचकांचं लक्ष वेधू इच्छितो. या कामी पुण्यातील 'सकाळ माध्यम समूहा'ने पुढाकार घेऊन एक अभूतपूर्व विधायक आंदोलनच उभं केलं. त्यासाठी सुमारे महिनाभर अहोरात्र झटून अथक प्रयत्नांनी जनजागृती केली. अनेक कारणांमुळे पूर्णपणे ढासळलेली आणि सर्वांनाच डोकेदुखी झालेली पुण्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारण्याच्या हेतूने प्रामाणिक प्रयत्नांची शिकस्त केली. तज्ज्ञांच्या मार्फत या समस्येचा सखोल व सर्वांगीण अभ्यास केला. या समस्येचा सातत्याने पाठपुरावा केला. शालेय विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनाच यासाठी एकत्र केलं. पक्षीय मतभेद नि अन्य सर्व प्रकारचे विसरून सर्वांनीच या प्रयत्नांना सक्रिय साथ दिली. पुण्यातील बस वाहतूक सुधारण्याच्या प्रक्रियेतील पहिलं महत्त्वाचं व प्रभावी पाऊल म्हणून 'एक नोव्हेंबर' हा 'पुणे बस डे' म्हणून साजरा करण्याचं घोषित झालं. तो दिवस पुण्यातील सर्व समाज घटकांनी अहमहमिकेने पुढे येऊन अपूर्व उत्साहात नि उत्सवी वातावरणात यशस्वीपणे साजरा केला. जाहिरपणे घेतलेल्या शपथेनुसार बहुसंख्य पुणेकरांनी त्या दिवशी बसनेच प्रवास केला आणि आपला या मोहिमेतला सक्रिय सहभाग नोंदविला. आम्ही स्वत: याला साक्षी आहोत. पुणेकरांच्या दृष्टीने हा जणू सोनियाचा दिवस होता. आम्हाला त्या वेळी आचार्य अत्र्यांची प्रकर्षाने आठवण झाली. आज अत्रे असते तर म्हणाले असते, ''गेल्या दहा हजार वर्षात असा दिवस उगवला नव्हता!''

पुण्यातील सार्वजनिक वाहतुक व्यवस्था प्रभावी व पुरेशी सक्षम होण्याच्या प्रक्रियेतील 'पुणे बस डे' हे पहिलं पाऊल तर यशस्वीपणे पडलंच आहे. पुढची पावले देखील अधिक दमदारपणे व आत्मविश्वासपूर्वक पडतील असा विश्वास आहे. देशात ज्या ज्या शहरातून अशी समस्या निर्माण झाली आहे तेथे देखील सर्वांनी एकत्र यावं आणि त्यातून यशस्वीपणे मार्ग काढावा ही अपेक्षा. आपल्या सर्वांचं सार्वजनिक जीवन अधिकाधिक निर्मळ, सुसह्य व सुखी-समाधानी व्हावं यासाठी अशा घटना असे संघटित प्रयत्न समाजाला मार्गदर्शक व अनुकरणीय व्हावेत हीच आमची अंतरीची तळमळ आहे.


- क्रांतिसेन रामचंद्र आठवले
भ्रमणध्वनी - ९८६९९४१६९१

## युनीट वार्ता

### सातारा युनीट :

सातारा येथे बँकेची डिस्पेन्सरी सुरू झाल्याची वार्ता संवादच्या मार्च २०१२ च्या अंकात दिली होती. त्या संबंधीचा उद्घाटनाचा फोटो बँकेने 'सेकंड इनिंग' च्या एप्रिल-जूनच्या अंकात प्रसिद्ध केला आहे. सातारा येथील आपले सभासद, डॉक्टरांना रुग्णांचे व औषधांचे रेकॉर्ड ठेवणे इ. कामात मदत करीत असतात. आता बँकेकडून एक नवा कॉम्प्युटर सर्व प्रकारचे रेकॉर्ड ठेवण्यासाठी उपलब्ध करून दिला आहे. त्याचे संबंधित सॉफ्टवेअर अपलोड केल्यावर त्याचा चांगला उपयोग दवाखान्यासाठी होईल असे सातारा युनीटचे अध्यक्ष श्री.एस.एस.देशपांडे यांनी कळविले आहे.

### कोल्हापूर युनीट :

कोल्हापूर युनीटची वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि. ५ सप्टेंबर २०१२ रोजी खरे मंगल कार्यालय येथे संपन्न झाली. सभेसाठी मुख्य पाहुणे म्हणून सर्कल असोसिएशनचे उपाध्यक्ष श्री.पी.एम.नारकर (पणजी) तसेच पुण्याहून झोनल सेक्रेटरी श्री.चंद्रकांत कुलकर्णी व माजी जॉइंट सेक्रेटरी श्री.मधुकर सरदेशमुख हे उपस्थित होते. सुरुवातीला पुढील सभासदांचे हार्दिक सत्कार करण्यात आले.

(१) श्री.एस.पी.कुलकर्णी हे युनीट स्थापनेपासून संघटनेचे खूप काम करीत असल्याने चांदीचे नाणे देऊन सत्कार करण्यात आला.

(२) श्री.आर.जी.कुलकर्णी यांनी युनीटची आर्थिक स्थिती चांगली करण्यास विशेष प्रयत्न केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

(३) श्री.पी.व्ही.कानिटकर यांची नात कुमारी जान्हवी हिचा दहा वर्षाखालील राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत यश मिळवल्याबद्दल सत्कार केला.

नवीन सभासदांचे स्मृतीचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. तसेच शिक्षक दिनानिमित्त, सर्वश्री आर.डी.गुप्ते व सदानंद फडणीस यांचा ते अपंग विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन करीत असल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

श्री.नारकर यांनी आपल्या उद्बोधक भाषणात श्रोत्यांशी संवाद साधला. श्री.चंद्रकांत कुलकर्णी यांनी कोल्हापूरकरांवर कौतुकाचा वर्षाव करीत आपण येथे मार्गदर्शन करण्यासाठी नव्हे तर मार्गदर्शन घेण्यासाठी आल्याचे सांगितले. श्री.सरदेशमुख यांनीही याप्रसंगी समयोचित भाषण केले.

यानंतर बँकेतर्फे 'पेन्शनर्स मीट' श्रीमती गीता पिले, ए.जी.एम., आ.र.बी.ओ. कोल्हापूर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. अध्यक्षीय भाषणात श्रीमती पिले यांनी त्या दिवशीच्या शिक्षक दिनाचा उल्लेख करून व्यासपीठावरील श्री.चंद्रकांत कुलकर्णी यांना, ते बांद्रा, एस.टी.सी.चे माजी चीफ इन्स्ट्रक्टर असल्याने,आपले गुरु मानत असल्याने त्यांचेविषयी, तसेच श्री.पी.एम.नारकर हे माजी वरिष्ठ अधिकारी (बॉस) असल्याचे सांगून दोघांविषयी आदर भावना व्यक्त केल्या व आपण पेन्शनरांच्या कोणत्याही अडचणी सोडविण्यासाठी सहाय्य करण्यास उत्सुक असल्याचे सांगितले.

यानंतर निवडणूक अधिकारी श्री.पोंक्षे यांनी पुढील दोन वर्षासाठी कोल्हापूर जिल्ह्यासाठी पुढीलप्रमाणे नवीन कार्यकारिणीची नावे टाळ्यांच्या गजरात जाहीर केली.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.आर.आर.कुलकर्णी | अध्यक्ष | ९४२१२०७४७६ |
| २) श्री.एन.पी.चव्हाण | उपाध्यक्ष | ९४२१२०३१६५ |
| ३) श्री.बी.के.गायकवाड | उपाध्यक्ष | ९४२२५०३६२२ |
| ४) श्री.व्ही.बी.मधाळे | सचिव | ९४२२४१९६२१ |
| ५) श्री.व्ही.के.नाडगौडा | खजिनदार | ८०८७२१६८६० |
| ६) श्री.बी.बी.कुलकर्णी | सहा. खजिनदार | ७५८८२२७७९२ |
| ७) सौ.पद्मजा बेकीनदार | सहा. सचिव | ९४२२५८१७७९ |
| ८) मिस्.नंदिनी पंढरपुरे | सहा. सचिव | ९४०३४०१०२९ |

आभार प्रदर्शन झाल्यावर सभा समाप्त झाली. सभेस अंदाजे २५० उपस्थिती होती. सभेनंतर सर्व सभासदांसाठी भोजन व्यवस्था करण्यात आली होती.

अल्टरनेट चॅनल - दि.२० ऑक्टोबर २०१२ रोजी रीजनल बिझिनेस ऑफिसच्या सहकार्याने 'अल्टरनेट चॅनल' संबंधी एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत मोबाईल बँकिंग, एस.एम.एस.ॲलर्ट, याला जोडूनच एस.बी.आय.लाइफ च्या फायदेशीर योजनांबद्दल माहिती देण्यात आली व त्यासंबंधी चर्चा करून शंका निरसन करण्यात आले. या कार्यक्रमास ५० सभासद हजर होते. त्यात महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

– सचिव, पुणे झोनल सब् सेंटर

## बहरलेली पालवी

स्वप्नवेडी ती रात पूनवेची
चांदण्याची बरसात करीत होती
शांत स्थिर जलाशयांमधूनी तेव्हा
पिठूर चांदीच जणू वाहत होती

अवती भवती झिंगलेल्या रानांमधूनी
वेडे पिसाट वारे धावत होते
इवल्याशा नाजूक हृदयांवर माझ्या
काटे भीतीचे जणू खुपत होते

दूर गावच्या वेशीवर मजला
तुझी सावली नजरेस पडली
थंडीत थरथरणाऱ्या देहावरती माझ्या
अचानक उबदार, पालवी बहरूनी आली होती

**– दिलीप अ. रेडकर,**
गोरेगाव, मुंबई

# स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल) पुणे
## नागपूर झोनल सब्-सेंटर
## आवाहन

महोदय / महोदया,

आपणास कल्पना असेलच, आमच्या सेवा आम्ही मे २०१२ पासून आपल्या असोसिएशन प्रती रुजू केल्या आहेत. ताबडतोबच १६ सप्टेंबर २०१२ रोजी बँकेतर्फे 'पेन्शनर्स मीट' व आपल्या झोनल सब्-सेंटरची वार्षिक सर्वसाधारण सभा अत्यंत यशस्वी रित्या पार पडली. यामध्ये विदर्भातील ५०० पेक्षा अधिक सभासदांनी उत्स्फूर्तपणे आपली उपस्थिती नोंदविली. असेच उत्साही वातावरण आम्हास नुकत्याच पार पडलेल्या आमच्या अकोला आणि अमरावती जिल्ह्यांच्या दौऱ्याप्रसंगी आढळून आले.

सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय यांच्या अगणित अडचणी सोडविण्याकरिता आपली 'संघटना' हेच ठोस उत्तर असू शकते. सध्याच्या घटकेस आपल्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना अडचणग्रस्त सभासदांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे व त्यांच्या तक्रारी निवारण करण्याचे कार्य सुद्धा तेव्हढ्याच जोमाने आपली संघटना करीत आहे.

वरील उद्देशाने प्रेरीत होऊन आम्ही संघटनेकरिता रोजच ३ ते ४ तास एका मध्यवर्ती ठिकाणी गरजू सभासदांना भेटत असतो जेणे करून त्यांच्या अडचणी आम्हापर्यंत विनासायास पोहचू शकतात. परंतु ही व्यवस्था तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे नागपूरात स्वत:चे कार्यालय असावे अशी गरज सर्व सभासदांना वाटू लागली व तसा ठराव नुकत्याच पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत पास करण्यात आला. नागपूरला स्तत:चे असे कार्यालय असावे असाच सूर अमरावती व अकोला येथील सभांमध्ये सुद्धा आढळून आला. सदर बाब आम्ही पुणे मुख्य कार्यालयाकडे उपस्थित केल्यावर त्यांचेकडून असे सांगण्यात आले की सर्कल असोसिएशनच्या मॅनेजिंग कमिटीने ठरविल्याप्रमाणे, जर झोनल सब्-सेंटरला तेथील असोसिएशन ऑफिसकरिता एखादी योग्य जागा विकत घ्यावयाची असेल तर जागेची किंमत व जागेच्या रजिस्ट्रेशन इ. एकूण खरेदी रकमेच्या किमान ५०% इतकी रक्कम झोनल सब्-सेंटरला सभासदांकडून देणगी स्वरूपात गोळा करून असोसिएशनकडे जमा करावी लागेल. म्हणजे बाकी ५०% रक्कम असोसिएशन घालून अशी जागा असोसिएशनचे नांवे विकत घेता येईल. आपण सभासदांकडून जो निधी/सभासद फी इ. जमा करतो ती सर्व रक्कम मुख्यालयाकडे पाठवितो. त्यामुळे नागपूर झोनल सब्-सेंटरजवळ कुठलाही निधी उपलब्ध राहत नाही.

वरील उद्देश लक्षात घेऊन बऱ्याच जागांची चाचपणी केली व आपल्या कार्यालयाला उपयुक्त असा एक फ्लॅट आमच्या नजरेत आला. त्याची अंदाजे किंमत आपल्या आवाक्यत असून त्यापैकी ५०% रक्कम आपल्याला जमा करावयाची आहे. उपरोक्त फ्लॅट हा सर्व सोयींनी युक्त आहे व त्यामधे एका वेळेस बाहेर गावाहून येणाऱ्या कमीत कमी ६ सभासदांची राहण्याची सोय आपण करू शकू, जेणे करून हा फ्लॅट संघटनेचे कार्यालय व ट्रॅन्झिट फ्लॅट म्हणून असा दुहेरी उपयोगिता प्रदान करू शकेल. या फ्लॅटसाठी आपल्या नागपूर झोनल सब्-सेंटर तर्फे आपल्या सर्वांना ५०% रक्कम म्हणजे अंदाजे रु.२० ते रु.२२ लाख किमान जमवावे लागतील अशी अपेक्षा आहे. तसेच हा व्यवहार येत्या २ महिन्यात पूर्ण करावा अशी फ्लॅट मालकाची अट आहे.

वरील अनुषंगाने आपणा सर्वांना कळकळीचे आवाहन आहे की कृपया आपण सर्वांनी मुक्त हस्ते या कार्यात आर्थिक सहयोग व आशिर्वाद द्यावेत ही नम्र विनंती. विदर्भातील आपल्या संघटनेच्या सभासदांची संख्या (Primary members around 1500) लक्षात घेता प्रत्येक सभासदाने कमीत कमी रु.५०००/- किंवा अधिक रक्कम संघटनेच्या विधायक कार्याकरिता उदार अंत:करणाने द्यावी हीच रास्त अपेक्षा.

या पूर्वीही संघटनेने ज्यावेळी हाक दिली त्यावेळी आपण सर्वांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे. असाच प्रतिसाद या वेळीही देऊन आमचे मनोबल वाढवावे व संघटनेची स्वत:ची वास्तु नागपूर शहरात घेता यावी याकरिता आपला सहयोग द्यावा.

कृपया आपले योगदान **"SBI Pensioners' Association (Mumbai Circle), Nagpur Zonal Sub-Centre - Building Fund A/c"** या नावाने क्रॉस चेक द्वारा खालील पैकी कोणत्याही पत्त्यावर जरूर पाठवावे. कृपया रक्कम कोणासही रोखीने देवू नये. किंवा आपण आपले योगदान संघटनेच्या व्हि.आर.सी.ई.(नागपूर) शाखेच्या (Br.Code - 06702) खाते क्र. ३२४७८४८६८६१ मधे जमा करून तशी पत्राद्वारे आपले नाव, सभासद क्र. व जमा केली रक्कम/तारीख याबद्दलची सूचना आम्हास देऊ शकता.

संघटनेच्या कार्याकरिता असलेली निकड लक्षात घेवून आपण जास्तीत जास्त सहयोग देऊन आम्हास उपकृत करावे, ही विनंती.

**नोव्हेंबर महिन्यात लाइफ सर्टिफिकेट बँकेत जाऊन देण्याचे लक्षात ठेवा**

आपणास विनंती आहे की आपले लाईफ सर्टिफिकेट ३० नोव्हेंबर २०१२ पूर्वी आपल्या पेन्शन पेइंग शाखेत अगर दुसऱ्या कोठल्याही शाखेत न विसरता जमा करावे.

कृपया आपला सध्याचा मोबाईल नं. व पत्ता बदलला असेल तर आम्हास कळवावा. आपल्या कांही अडचणी असल्यास त्या आम्हास जरूर कळवाव्यात.

आपणा सर्वांना दियाळी व नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

आपले स्नेहांकित,

| V.D.Deshpande | N.S.Nagraj | Sudhir Agrekar | D.B.Khobtagade | A.P.Valokar |
|---|---|---|---|---|
| President | Vice-President | Secretary | Joint Secretary | Treasurer |

************************************************


| | | |
|---|---|---|
| Shri.V.D.Deshpande | : | Plot No.209, Srikripa,<br>Surendra Nagar, Nagpur - 440015 (M)9422108532; |
| Shri.N.S.Nagraj | : | 'Prabhat', jathar Peth, Gupte marg,<br>Akola - 444005 (M )9423127787 |
| Shri.Sudhir Agrekar | : | 17/A Mahavir Nagar, P.O.- Hanumannagar,<br>Nagpur - 440009 (M)9422105030 |
| Shri.D.B.Khobragade | : | 48 "Pradnya", Rathi Nagar,<br>Amravati - 444603 (M)9372034464 |
| Shri.A.P.Valokar | : | 36, SBI Colony, karim Layout,<br>Gopal Nagar, Nagpur - 440022 (M)9890616214 |


************************************************


सुश्रेय प्रकाशनतर्फे दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

सौ. श्वेता गानू लिखित आमचे प्रकाशित साहित्य



स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये
२७ वर्षे नोकरी.
मुंबई दूरदर्शन व आकाशवाणी या
कार्यक्रमांमध्ये अनेकवेळा सहभाग.

**स्वयंसिद्धा** – प्रकाशन : श्री. जयंत साळगावकर
**उद्योजकांची साधना** – प्रकाशन : श्री. मनोहर जोशी आणि श्री. पृथ्वीराज चव्हाण
**ध्येयसाधना** – प्रकाशन : श्री. नितीन गडकरी आणि प्रिन्सिपॉल अनिरुद्ध देशपांडे
**स्वयंप्रज्ञेचा शोध** – प्रकाशन : श्री. डी. एस. कुलकर्णी आणि श्री. विजयसिंहराजे पटवर्धन, सांगली
**अंतरीचा गाभा विराटाचा** – प्रकाशन : श्री. मनोहर जोशी आणि श्री. एकनाथ ठाकूर
**मी कर्ता मी निर्माता** – प्रकाशन : श्री. गोविंदराव केळकर आणि श्री. नितीन गडकरी
(नॅब संस्थेद्वारे 'टॉकिंग बुक'साठी निवड झालेले आणि सीडी ध्वनिमुद्रित झालेले पुस्तक)
**कहाणी एका जिद्दी ध्येयवेड्याची** – प्रकाशन : श्री. कुमार केतकर व श्री. मोहनराव कुलकर्णी
**एका वैनतेयाची भरारी** – प्रकाशन : श्री. अशोक पानवलकर (संपादक म. टा.)
**ध्यास ध्येयपूर्तीचा** – प्रकाशन : श्री. डी. शिवानंदन (पोलीस महासंचालक)
**बिल्डर व्हायचंय मला** – प्रकाशन : श्री. सुशीलकुमार शिंदे (केंद्रीय ऊर्जामंत्री)
**सायकल ते BMW** – प्रकाशन : श्री. डी. एस. कुलकर्णी
**स्वप्नांना ओढ समृद्धीची** – प्रकाशन : मा. श्री. मनोहर पर्रीकर (मुख्यमंत्री गोवा राज्य)
**शिंपल्यातील मोती** – प्रकाशन : श्रीमती स्नेहलता देशमुख
**विविध संकल्पना असलेल्या दैनंदिनींची निर्मिती**

सुश्रेय प्रकाशन : ०२२–२५४२२३१९

**State Bank of India**
**Corporate Centre**

*e-Circular*

No. P&HRD Sl. No.: 190/2012-13
Circular No. : CDO/P&HRD-PPFG/16/2012 - 13
Dt. : May 26,2012.

## SBI EMPLOYEES PENSION FUND NOMINATION OF SPOUSE INCLUDING DISABLED CHILDREN FOR THE BENEFIT OF FAMILY PENSION BEFORE RETIREMENT

At present in our Bank there is no provision for registering nomination for family pension by an employee while in service. The details of family members to whom family pension is payable after the death of the employee is obtained at the time of submitting application for sanction of pension. In the absence of the provision for nominating before retirement, inclusion of name(s) of children with disabilities for the benefit of family pension of the employee becomes genuinely difficult in the case of death of the employee while in service. Further we have been receiving a large number of requests from pensioners for including the name(s) of their disabled children, who have forgotten to declare their name(s) at the time of their retirement.

2. The matter has been examined at Corporate Centre and it has been decided to follow the following guidelines for nominating spouse and disabled children for the benefit of family pension by an employee before his / her retirement :

i. An employee may be allowed to nominate his / her spouse and disabled children for the benefit of Family Pension before his / her retirement.
ii. Such Nomination may be made in the prescribed format (enclosed alongside) in triplicate along with disability certificate for disabled children issued by a Medical Officer not below the rank of a Civil Surgeon as per Corporate Centre Circular No. CDO/PM/16/CIR/10 dated the 30.04.2002.
iii. Such Nomination should be recorded in the Service Sheet / File of the employee concerned with a copy thereof attached to his Service Sheet / File.
iv. A copy of the Nomination form should be forwarded to CAO, Kolkata, where the same should kept with PF/Gratuity Nomination forms of the concerned employee.
v. A copy of the Nomination Form should be returned to the employee as acknowledgement of receipt.

Please note to bring the contents of this circular to the notice of all concerned.

Yours faithfully,
Sd/-
For Dy. Managing Director &
Corporate Development Officer

(Nomination Form printed on next page)

**Don't forget to give Life Certificate in November in the Bank**

## NOMINATION FOR FAMILY PENSION

Name of the Branch & Code No. ________________ Circle ______________
Place :______________
Date :______________

1. Name of the Employee :
2. P.F. Index No. :
3. Designation / Grade :
4. Permanent address of : the employee
5. Date of Birth :
6. Date of appointment : in the Bank.
7. Date of Confirmation : in the Bank
8. Date from which service : Counts for pension
9. Details of members of the family including the name of children with disabilities, if any, to whom Family Pension will be payable afterwards:

| Sr.No. | Name of the family members (including disabled child) with address | Date of Birth | Relationship with the employee | Details of disability certificate issued by Medical Officer not below the rank of Civil Surgeon |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

I hereby declare that the above particulars of my family members are correct and I agree that the family pension is payable subject to terms and conditions as stipulated in relevant rules, regulations, instructions of the Bank issued from time to time, family pension scheme in force at the relevant time.

I hereby undertake to keep the above particulars up-to-date by notifying to the Head of the Office / Branch Manager of any change that may occur hereafter.

I am
Yours faithfully,

(Signature / Thumb impression)

Witness :-

1) Signature _______________
Name __________________
Designation _____________
Address ________________

2) Signature _______________
Name __________________
Designation _____________
Address ________________

Member's signature verified by me
Branch Manager / head of the Department

## भारतीय रेल
## यात्रीयों के लिये सूचना

(च) - ८१२१२८१२१२

इस मोबाईल नंबर को अपने मोबाईल में सुरक्षित कर लें

क्योंकि

- आपके बोगी में सुरक्षा की जरूरत हो ।
- आपके बोगी में पानी की जरूरत हो ।
- बोगी में कोई अत्यधिक बीमार पड गया हो ।
- बोगी में कोई खराबी आ गई हो ।

या

- कोई भी शिकायत योग्य समस्या हो ।

तो

ऊपर दिये नंबरपर डायल करें और समस्या विवरण दें ।

अगले स्टेशन पर समस्या समाप्त हो जाएगी

पढ लिए तो शेअर करें और दूसरे को भी बताऐं ।

**************

*Contributed by - S.V.Shastri, Hyderabad*

## डोंबिवली युनीट

डोंबिवली, कल्याण, बदलापूर व भिवंडी या भागातील बँकेच्या सर्व पेन्शनर्स व फॅमिली पेन्शनर्स साठी एक सभा आयोजित केली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

**सोमवार दि. १७ डिसेंबर २०१२ रोजी सायंकाळी ४॥ वाजता**

**स्थळ :- स्टेट बँक ऑफ इंडिया, टिळकनगर, डोंबिवली**

सभेला श्री.गोखले, अध्यक्ष उपस्थित राहणार आहेत. तरी जास्तीत जास्त संख्येने सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

**सुभाष आगरकर**
ऑर्गनाइझिंग सेक्रेटरी

**Members' Views :**

I enjoyed reading the article by Shri.S.V.Naik which is very useful as a guidance to YOUNG pensioners like me to lead a contented peaceful life in the last leg of ours. You have done a wonderful job in publishing such a detailed article, though, hopefully the readers will feel like me.

**- Arvamadhan**

## For information of All the Members

As per the decision of the Executive Committee taken in its meeting held on 3-10-2012 at Thane, it has been decided to increase the Accommodation Charges for the Association's **HOLIDAY HOME** at Panaji (Goa) from Rs.150/- per bed to Rs.200/- per bed (i.e. Rs.400/- for the Room of two beds) **with effect from 1st January 2013.** The Holiday Home has now been provided with the facility of TV with Cable connection.

- Secretary

## श्रद्धांजली

आपल्या 'संवाद'च्या संपादक मंडळातील आमचे खंदे सहकारी श्री. श्रीधर विश्वनाथ तथा शिरूभाऊ सहस्रबुद्धे यांचे गुरुवार दिनांक ५ नोव्हेंबर २०१२ संध्याकाळी ८ वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने पुण्यात आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनामुळे 'संवाद'च्या संपादकीय व अन्य लेखन प्रपंचातील महत्त्वाच्या आधारस्तंभाला आम्ही कायमचे मुकले आहोत. त्यांची उणीव सतत जाणवत राहील. त्यांचे मराठी, संस्कृत व इंग्रजी या भाषांवर विलक्षण प्रभुत्व होते. त्यांची स्मरणशक्ती अत्यंत तल्लख होती. जुन्या साहित्यातील व इतिहासातील अचूक संदर्भ तपशिलासह ते तात्काळ देत असत. त्यांच्या रूपाने एक अभ्यासू व व्यासंगी व्यक्तिमत्त्व हरपले आहे. त्यांच्या आत्म्याला शांती मिळो व त्यांच्या कुटुंबियांना हे दु:ख सहन करण्याची शक्ती लाभो अशी आम्ही परमेश्वर चरणी प्रार्थना करतो. कै. शिरूभाऊ सहस्रबुद्धे यांच्या पवित्र स्मृतीस आमची 'संवाद'च्या वतीने विनम्र आदरांजली.

– संपादक मंडळ, संवाद

**State Bank of India**
**Corporate Centre, Mumbai**

*e-Circular*

**GOVERNMENT ACCOUNTS DEPARTMENT**
Sl. No. 748/2012-13
Circular No. : NBG/GAD-PENSION/35/2012-13
Wednesday, October 17, 2012.

The Chief General Manager,
State Bank of India,
Local Head Office,
All Circles.

e-Circular No.NBG/GAD-PENSION/35 Dt. 17-10-2012

Dear Sir,

**PENSION DISBURSEMENT**
**ADDITIONAL INFORMATION FROM PENSIONERS**
**DURING SUBMISSION OF LIFE CERTIFICATE**

It has been decided to collect the information as under from the pensioners during their visit to the branches for submission of Life Certificate in November 2012.

(i) Income Tax Permanent Account Number (PAN)

(ii) Mobile number of the pensioner

(iii) Date of birth of the spouse (with proof), if it is not available in the PPO

2. The additional information from the pensioners are required for :

(a) Correct deduction of Income Tax at source. Income Tax at higher rate will be deducted, if PAN is not available in the Pension software.

(b) Providing details of the pension paid and other promotional message through SMS - better communication with the pensioner.

(c) Requirement of Government authorities for issue of revised PPO.

The additional information will form a part of the Life Certificate to be obtained from the pensioner.

3. We, therefore request you to instruct the Pension Paying Branches / CPPC to obtain Life Certificate from pensioners on the enclosed revised format. PAN of the pensioner and mobile number should be entered in the pension software by the branch and information of Date of birth (along with proof) should be transmitted to the CPPC to enable them to capture the date. Adequate publicity may kindly be made at the Circle level advising the pensioners to bring the relevant documents as proof of Date of Birth of spouse for submission along with the Life Certificate.

Yours faithfully,
Sd/-
General Manager (AB&R)

(Annexure printed on Next page -

# LIFE CERTIFICATE

(To be submitted by Pensioner once a year in November)

Certified that I have seen the pensioner Shri/Smt/Ms.______________________________.
(Name of Pensioner)
holder of Pension Payment Order No._________________________________ and that he/she is alive on this date.

Name :-
Place :-
Date :-

Designation of Authorised Officer
Seal -

ADDITIONAL INFORMATION :

I submit herewith additional details as under :

1. Income Tax Permanent Account Number (PAN) :-
2. (a) Mobile No.:
   (b) Alternate Mobile No. :
3. Date of Birth of the spouse :
   (Proof of Date of Birth attached)

Signature -

Name of the Pensioner_____________________

Savings Bank Account No. :_________________

****************************************************************************************************

# ☺ विनोद ☺

## नवरा-बायको

नवरा-बायको कारने जात असतात.
रस्त्यात एक बोर्ड दिसतो
''सावधान ! अपघाती वळण
वाहने सावकाश चालवा !
नवरा गाडीचा वेग कमी करतो.

बायको- ''मला एक कळत नाही हे लोक अपघाती वळणावर रस्ता का बांधतात ?''

*****

## मदिरा पान

डॉक्टर - (एका बेवड्या पेशंटला)

''मदिरा-पान तुमच्या प्रकृति साठी अत्यंत हानीकारक आहे. त्यासंबंधी मला आपल्याशी सविस्तर चर्चा करावी लागेल.''

पेशंट - ठीक आहे. मग आपण सायंकाळी ७ वाजता 'मुनलाईट' बार मध्ये भेटू.''

- वसंत धुपकर,पुणे
दूरध्वनी - ०२०-२०२५५४०८

Ekanath S. Thakur
Chairman

Saraswat Bank

Ref.: SCB/CO/94/SEC/CH/406 5th October, 2012

Dear Shri Gokhale,

I hope my letter finds you in the best of health and spirits.

I write to you after I chanced upon a copy of the August 2012 issue of *Samvad* – the newsletter of SBI Pensioners' Association received by my wife, Sou. Anuradha. I was pleasantly surprised to read your letter which was reproduced in that issue, addressed to me, communicating a reference to me at the AGM. I am extremely sorry, but I did not receive the original letter. Hence, I now take this opportunity to respond.

I am extremely grateful for the prayers, the standing ovation and good wishes for my speedy recovery of all the respected members at the AGM of SBI Pensioners' Association on 19th July, 2012 held at Pune. I resigned from SBI in 1976 and indeed I am really touched to be remembered so fondly even after a span of nearly thirty-six years. It is my firm belief that such kind gestures and good wishes of well-wishers have contributed directly to my speedy recovery. I am deeply grateful to each and every member present and also to the organizers and more particularly to you for that excellent gesture of a refined culture towards me.

The Saraswat Co-operative Bank Ltd. (A Scheduled Bank)
[illegible]
[illegible]

2

In the extensive surgery, on my head and neck region, two tumors virtually sitting on my spine were carefully removed. The surgery was performed by world-renowned neurosurgeon, Dr. P.S. Ramani at Lilavati Hospital. The surgery lasted for over seven hours. Now, you will be happy to know that my surgery was successful. I had to perforce undergo complete rest and recuperation, especially in the first three months following the surgery, as per the doctor's advice. The normal recovery period for such surgeries is five to six months. Even now, after four months, I have only partly resumed work at the Bank.

I am truly sorry that due to the above constraints, I could not attend the AGM in spite of my firm commitment to you earlier. I wish the members of the SBI Pensioners' Association all the very best for a healthy and fulfilling life.

Thanking you and with warm personal regards to you and respected Shri Dandekarsaheb,

Yours sincerely,

(Eknath K. Thakur)
Chairman

Shri V.M. Gokhale, President,
State Bank of India Pensioners' Association,
(Mumbai Circle),
A-5, Swami Siddharth CHS,
S.V. Road, Naupada,
Thane – 400 602

## "Satyamev Jayate"

Don't we are engulfed with a sense of shame that India having attained the so called Independemce about 65 years ago, it requires a bollywood actor like Aamir Khan to show light to the entire country, the insensitive Government, its true face on so many burning issues which are day in and day out eating into the vitals of the society. We look the other way when something horrible happens before our eyes, but we are not moved a little bit, as we are not the victims. There are things about Indian society, that are so agonising that only way to deal with them is to took the other way. Don't we have ultrasound centres in our neighbourhood, which help to kill girls, while they are still in the wombs of their mothers. Everyday we see children begging on streets at the behest of their masters and they are severally being abused by the owners of shelter homes, which run under the protection of politicians and the so called protectors of law. The country has not been able to wash the curse of 'Manual Scavenging'. No potable water has been made available to millions of Indians all these years. There is well established nexus between the Doctor and Chemists as also the pharmaceutical companies. We are all aware that the majority of Indians are taking poison with every morsel of food. Are we not aware that natural resources are being looted by the powerful in the country. We are all watching it helplessly as our democratic government is not at all bothered to set things right. They feel that depravity will get them votes and they will be able to rule perpetually. No leader, the so called public servent will address the woes of the masses.

The print and electronic media have also abdicated their duty. They will run after politicians and waste days and days to listen to the shameless leaders or their cronies.

You will wonder why the above facts are being brought to the notice of readers.

We are also suffering the apathy of this thick skinned government; non-assertive management and not a supportive attitude of our younger brothers, who can be instrumental in undoing so many wrongs heaped upon us for the last over more than two decades.

There are a very few politicians who think about the welfare of personnel working in departments under their control. We can not hope to have A.K.Anthony as Finance Minister, who as Defence Minister of the country, has written a strong letter to the Prime Minister, warning him of unrest in the ranks of Armed Forces, in case the issue of one rank, one pension and dispatities in their pay band is not resolved at the earliest.

The Bank employees are the backbone of Economy so vital for the country's stability and growth. Yet they are looked upon with disdain. They do not get their due and the remunerations are steeply declining with every wage revision. The Banking Industry is carrying a disgruntled work force which can prove extremely dangerous for the economy.

The Government has divided the pensioners into two classes - viz. favoured and ignored. There is no bar in lavishing favour on Government pensioners with no budget constraints, as all the payments are charged to Consolidated Fund, built upon taxes from other sectors. The pensioners in the Banking Industry, especially in State bank of India are denied their legitimate dues for decades. Entreaties and representations at various levels have failed to yield any result. Our only hope is our case in the Hon'ble Supreme Court of India and we are hopeful of getting justice so long denied to us as our cause is just and right. Our fight will not end with the outcome of this case as there are other glaring disparities to which we are subjected to. Let us pray to GOD for **'Satyamev Jayate'**.

*- Courtesy - "SBI Pensioners' Mail", Chandigarh Circle Pensioners' Association's monthly magazine issue of September 2012*

## सांगली युनिट -

### १२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

रविवार, ता. १७/६/२०१२ रोजी सकाळी १०.३० वाजता दांडेकर हॉल, विश्रामबाग सांगली येथे सांगली युनिटच्या १२व्या आमसभेस सुरुवात झाली. एकूण ११० सभासद-सहसभासद उपस्थित होते.

स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व गणेश पूजन झाल्यानंतर गेल्या वर्षभराच्या कालावधीत निधन पावलेले सभासद श्री. एस. ए. तेरवाडकर व सहसभासद सौ. पी. डी. पुजारी व सौ. बेडेकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

आमसभेसाठीश्री. नारकर (पणजी) श्री. एस्. डी. मेहता (खेड-रत्नागिरी) श्री एस. व्ही. सहस्रबुद्धे, श्री. जी. एस्. करमरकर, पुणे यांच्याकडूनआलेले शुभ संदेश वाचन झाले.

या वर्षात नोंदविलेले नवीन सभासद, सहसभासद यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत झाले व या वर्षात ७५ वर्ष पूर्ण करणारे ज्येष्ठ सभासद श्री. के. व्ही. गाडगीळ, श्री. एम्. एस्. कुलकर्णी व सहसभासद सौ. रजनी बोरगावकर यांचा अध्यक्ष श्री. एस्. एस्. कुलकर्णी यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

सचिव श्री. एस. जी. करमरकर यांनी मागील वर्षी ता. १२ जून २०११ ला झालेल्या आमसभेचे इतिवृत्त सादर करून त्यास सभेची संमती घेतली. तसेच वर्षातील आर्थिक अहवाल सादर करून त्यास सभेची संमती घेतली. नंतर त्यांनी चालू वर्षातील कार्यक्रमाचा अहवाल सादर केला. ह्यामध्ये त्यांनी वर्षभरात झालेल्या कार्यकारिणी, पदाधिकारी यांच्या सभेचा आढावा घेतला. नवीन सभासदांना कार्यकारिणीत येण्याचे आवाहन केले. ता. १७/६/२०१२ अखेर १८१ सभासद १६८ सहसभासद व २६ फॅमिली पेन्शनर-सभासद असे एकूण ३७५ सभासद संख्या असल्यसाची त्यांनी माहिती दिली.

निवडणूक अधिकारी श्री. ए. एल. जोशी यांनी २०१२-१४ या कालावधीच्या नवीन कार्यकारिणीच्या २४ सभासदांची नावे जाहीर केली व त्यास सर्व सभेने एकमुखी मान्यता दिली.

त्यानंतर ॲड. श्री. पी. एम्. माळगे यांनी पेन्शन व फॅमिली पेन्शन संबंधी माहिती सांगून २ जुलै २०१२ रोजी सुप्रिम कोर्टात सुनावणीसाठी येणाऱ्या आपल्या असोसिएशनच्या थझ १८४/२०११ च्या दाव्यासंबंधी माहिती दिली.

स्टेट बँकेच्या विश्रामबाग शाखेचे व्यवस्थापक श्री. ब्रह्मनाळकर यांचे सभेमध्ये आगमन झाल्यावर त्यांचा सत्कार व स्वागत झाले.

सहसभासद सौ. सुरेखा केशव गाडगीळ यांनी आपले मनोगत व्यक्त करताना स्टेट बँक व स्टेट बँक इंडिया पेन्शनर्स असो. चे आभार मानले.

एसबीआय लाईफ सांगली शाखेचे श्री. महेश गोंधळी यांनी एसबीआयच्या निरनिराळया स्कीम्स्ची माहिती दिली. पेन्शनरर्सना एजन्सी घेऊन त्यांच्या व्यवसायात वृद्धी करण्यास मदत करावी तसेच आपले उत्पन्न वाढवावे असे आवाहन केले.

अध्यक्ष श्री. एस्. एस्. कुलकर्णी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात असोसिएशनच्या बुधवार कट्टा व अन्य सांस्कृतिक कार्यक्रमात बहुसंख्येने सहभाग घ्यावा असे आवाहन केले.

श्री सुरेश छत्रे यांनी आभार प्रदर्शन केले व सर्वास भोजनाचा आस्वाद घेण्याची विनंती केली.

भोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

- स. दि. करमरकर, सचिव

******

## Solapur Unit

Annual General Meeting of Solapur Unit was arranged on 10/3/2012 at Amphi Theatre Solapur under the chairmanship of Shri. B. B.Kulkarni, President.

The meeting was attended by around 140 members. In the meeting Mrs & Mr. R. M. Kulkarni and Mrs.Sortur were felicitated who have completed 15 years of their marriage. Shri Munoli was felicitated for his best performance in Table Tenis for senior citizens. Shri.Deo has been elected as Secretary, Bharat Vikas Parishad – Solapur branch. Shri.Lavnis was felicitated for his various cultural and social activities during the year. Shri.Andore, Advocate, a guest artist presented a short play titled as ‘Bus stop’ along with Shri.Lavnis. Biennal Elections of the unit were held and the following members were unanimously elected and continued as office bearers for next two years.

| | |
|---|---|
| Shri. B. V. Kulkarni | – President |
| Shri. M. W. Deshpande | – Vice President |
| Shri. T. M. Patil | – Secretary |
| Shri. N. S. Ambuse | – Assit Secretary |
| Shri. D. R. Bendre | – Treasurer |
| Mrs. M. G. Sortur | – Ladies Representative |

**- T. M. Patil,**
Secretary

# आपली असोसिएशन व 'संवाद'

'स्टेट बँक ऑफ इंडिया निवृत्त कर्मचारी संघटनेची स्थापना व कार्यवाही सन १९७४ या वर्षापासून सुरू झाल्याचे आपणा सर्वांना विदीत आहेच. त्यानंतरच्या २५ वर्षांच्या कालखंडात संघटनेने केलेल्या भरीव कामाचा तपशील देणारे 'दोन दशकांची कामगिरी आणि २५ वर्षे पूर्ण केल्याचा 'रजत जयंती' आढावा देणारे, असे दोन अंक प्रसिद्ध झाले आहेत. आज संघटनेला ३८ वर्ष पूर्ण झाली आहेत. अशीच वाटचाल भावी काळात चालू राहील याची खात्री आहेच.

मधल्या काळात संघटनेकडून आणखी एक उपक्रम राबविला जात आहे तो म्हणजे सन २००३ च्या वर्षप्रतिपदेपासून (अपवादात्मक कारणाने ५ महिन्यांचा काळ सोडून) अखंडपणे 'संवाद' या नामाभिदाने संघटनेची 'गृहपत्रिका' प्रसिद्ध होत आहे (दर महिन्याच्या रुपाने) व त्याचे वितरण सभासदांकडे होत आहे. सन २०१२ च्या जून अखेर असे एकूण १०४ अंक प्रसिद्ध झाले आहेत. सहेतुक नव्हे, पण योगायोगाने हे सर्व अंक माझ्याजवळ आहेत. 'संवाद'च्या प्रसिद्धीचा ९ वर्षांचा काळ पूर्ण झाला असून १० वर्षे पूर्ण होण्याला अजून एक वर्ष बाकी आहे. आतापर्यंत प्रसिद्ध झालेले सर्व अंक संघटनेच्या मुख्य कार्यालयात उपलब्ध असतीलच. अंकांच्या माध्यमातून झालेल्या कामाचे अवलोकन करावे असे वाटले म्हणून हा लेखन प्रपंच केला आहे. विस्तार भयास्तव कामाचा सविस्तर आढावा घेणे माझ्या आवाक्याबाहेरचे असल्याची जाणीव झाली, परंतु काही ठळक घटना व माहिती व घटनाक्रम नमूद करण्याच्या विचाराने सदर माहिती (लिखाण) केले आहे.

बँकेमध्ये कार्यरत असल्यापासूनच मराठी भाषा व साहित्य याची आवड असणारे श्री. पी. के. देवधर यांनी संपादकत्वाची धुरा निभावत कार्य केले, अर्थात सर्वश्री गुपचूप, शिंगवेकर, धुपकर अशांचे व अन्य अनेकांचा या कामात सहभाग होताच. साधारण २००५ नंतर काहीशा प्रकृति अस्वास्थामुळे एकेरी संपादकत्वाचे काम त्यांनी सोडले. वरील सभासदांबरोबरच आणखी दोन सभासद सर्वश्री श्री.वी. सहस्रबुद्धे, क्रांतिसेन आठवले हे कार्यरत आहेत. आळीपाळीनेही धुरा ते सध्या निभावत आहेत.

माहितीच्या आधारे असे दिसते की, त्यावेळी कार्यरत असलेले सचिव श्री. पु. वा. भावे यांच्या पुढाकाराने 'संवाद' मासिकाचा शुभारंभ झाला. पहिल्या अंकातच संपादक श्री. देवधर यांनी विनंती केली होती की, सभासदांनी ''आता घ्या लेखणी करी आणि लिहा तुम्ही सत्तरी' या विनंतीला सभासद लेखकांनी योग्य ती साथ दिली असल्याचे गेल्या ९-१० वर्षाची वाटचाल दर्शवीत आहे. पहिल्या चार वर्षअखेर पर्यंत तरी अंकाचा वाङ्मयीन स्तर फारसा आकर्षक नव्हता. पुष्कळसा मजकूर संघटनेचा जमाखर्च, बँकेकडून मिळणाऱ्या सुविधांची माहिती, सभासदांना बँकेतील कार्यकालामध्ये आलेले अनुभव यासंबंधी होता. 'संवाद' मासिकाला आज आलेले वाङ्मयीन स्वरूप हे बाहेरच्या जगातील प्रसिद्ध होणाऱ्या अन्य मासिकांच्या दर्जाचे आहे असे वाटणे ही अतिशयोक्ती नाही.

असे वाटते की, स्वातंत्र्यपूर्व काळापासून (साधारण गृहीत धरलेला १९५५ च्या पूर्वीचा काळ) अस्तित्वात असलेली कारकून-कॅशिअर्स व अन्य अशा सर्वांची संघटना- त्यानंतर काही वर्षांनी स्थापन झालेली अधिकारी वर्गाची संघटना आणि आज अस्तित्वात असलेली सर्व श्रेणीतील निवृत्त कर्मचारी संघटना यांच्या कार्याची सुरुवात व पुढील वाटचाल यावर फार मोठा प्रभाव पुणे येथे झालेल्या कामाचा आहे. अन्य ठिकाणी होत असलेल्या अशाच स्वरूपाच्या कामाचे महत्त्व कमी असे लिहिण्याचा हेतू नाही. महत्त्वाचे कारण असे की, पुण्याचे मध्यवर्ती स्थान महात्म्य आणि आवश्यक त्या सोयी-सुविधा येथे निरंतर उपलब्ध आहेत म्हणजेच काम करण्याच्या सुकरतेत आहे. यामुळेच योग्य ठिकाणी व परिसरात संघटनेचे कार्यालय स्वत:च्या मालकी हक्काने उभे आहे.

असे दिसते की, अलीकडील गेल्या ४-५ वर्षांच्या काळात विषयांची व्याप्ती वाढली आहे. बँक व्यवहाराच्या कक्षेबाहेरील विषयांवर सभासदांकडून लेख येत आहेत. मुंबई सब सेंटरच्या कार्याचा व्याप तसा मोठा आहे. त्यामुळे त्यांच्या कक्षेत असलेल्या सभासदांकडून येणाऱ्या लेख-कविता आणि अन्य विषयावरील माहितीचा दर्जा व ओघ चांगला आहे. कोल्हापूर-सांगली-नासिक-अमरावती-नागपूरसह विदर्भाचा भाग येथून आलेल्या लेखांचा वाटाही चांगला आहे. शेवटी मासिकाची दर्जायुक्त भरभराट होवो व होईलच अशी सदिच्छा व्यक्त करतो.

– **ह. धो. चितळे**, पुणे

## विनोद

पत्नी – का हो! तुम्ही डॉक्टरांकडे जाऊन आलात का?

पती – हो. डॉक्टर भेटले.

पत्नी – तुमच्या पोटाच्या तक्रारीबद्दल त्यांना सविस्तर सांगितले ना?

पती – हो सगळं सांगितले.

पत्नी – मग काय म्हणाले? काही पथ्य पाणी?

पती – त्यांनी एकच पथ्य पाळायला सांगितले आहे.

पत्नी – कोणते ?

पती – आठ दिवस घरचे जेवण घेऊ नका. पोट आपोआप जाग्यावर येईल.

– प्रभाकर गुपचूप, पुणे

भ्रमणध्वनी – ९८८१५७९४९९

# मनोगत एका पेन्शनराचे

'संवाद'चे सर्व सभासद, दर महिन्याचा 'संवाद' आपुलकीने वाचत असतात. ऑगस्ट २०१२ च्या संवादच्या अंकातील बातमीवरून आपणास कळले असेल की, आपल्या सर्व पेन्शनरांचे व फॅमिली पेन्शनरांचे पेन्शन रेकॉर्ड पी.पी.जी. डिपार्टमेंट मुंबई, ह्यांचेकडून कोलकात्यास गेलेले आहे. मे २०१२ पासून कोलकात्यास गेलेले आहे. मे २०१२ पासून कोलकात्याचे सेंट्रल अकाऊंटस् ऑफिस पेन्शन पेमेंट करीत आहे. सेंट्रलायझेशन सिस्टीम असा हा निर्णय झालेला आहे. त्यामुळे ह्यापुढे नवीन पेन्शनर आणि फॅमिली पेन्शनरांना आपला सर्व पत्रव्यवहार मुंबईऐवजी कोलकात्यास करावा लागेल. ही पद्धत नुकतीच सुरू झाल्याने पी.पी.जी. मुंबई यांनी आपले सर्व रेकॉर्ड कोलकात्यास पाठविले आहे. ही नवी योजना वा बदल परिपूर्ण होईपर्यंत पेन्शनर्स आणि फॅमिली पेन्शनरांना पेन्शन मिळण्यास उशीर होत आहे.

तेव्हा सर्व सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपली पेन्शन फाईल नेहमी परिपूर्ण ठेवावी, म्हणजे फॅमिली पेन्शनर व्यक्तिस पेन्शन मिळण्यास अडचण येणार नाही. सर्वसाधारण पेन्शनर्स ह्याबाबत कमालीचे उदासीन असतात. याचा त्रास त्यांच्या फॅमिलीस होतो. आजपर्यंत मुंबईस पी.पी.जी. डिपार्टमेंट फक्त आपल्या सर्कलचेच हे काम करीत असल्याने पेन्शन थोडे लवकर मिळत असे. आता कोलकात्यास सर्व सर्कलचे सेंट्रलायझेशन झाल्याने काम वाढणार आहे. तेव्हा आपली पेन्शन फाईल जेवढी बिनचूक असेल तेवढे आपले काम लवकर होईल.

आपणास माहीतच असेल की, पूर्वी हे काम कोलकात्याहूनच होत असे. आपण बँकेत असताना प्रॉव्हिडंट फंडाची स्टेटमेंटस् २-२ वर्षांनी उशीरा येत असत. पण शाखा व कर्मचारी वाढल्याने बँकेने विभागाप्रमाणे विकेंद्रीकरण केले व सर्व रेकॉर्ड प्रत्येक सर्कलकडे विभागले गेले. आता संगणकीकरण झाल्याने हे काम पुन्हा केंद्रीकृत झाले म्हणजे कोलकात्यास गेलेले आहे.

बँकेत असताना, आपण अनेक टेबलावर काम करीत असताना, अनेक विषयाचे ज्ञान आपल्या सभासदांना होते. पण पेन्शन हा त्यांच्या अभ्यासाचा विषय नव्हता, कारण तो ग्राहकांसंबंधी नव्हता. त्यामुळे ह्या विषयी बँकेत अत्यंत मोजक्या लोकांनाच संपूर्ण माहिती होती. आतासुद्धा डी.जी.एम/ए.जी.एम्/ब्रँचेस ह्या सर्व विभागात ह्याविषयी माहिती अत्यंत मोजक्या लोकांना आहे. सर्वजण पी.पी.जी. डिपार्टमेंट मुंबई ह्यांचेकडे बोट दाखवितात. नुकतेच निवृत्त झालेले पुण्यातील एक शाखाधिकारी, ह्यांचा पेन्शन पेमेंट ॲडव्हाईस चुकीचा आला होता, हे त्यांना सुद्धा कळले नाही. परंतु आपल्या असोसिएशनचे वयोवृद्ध सभासद श्री पराडकर ह्यांनी ही चूक त्यांच्या लक्षात आणून दिली. गेले २५-३० वर्षे श्री पराडकर हे काम आनंदाने व हिरीरीने करत असून त्यांनी अनेक फॅमिली पेन्शनरांना न्याय मिळवून दिलेला आहे. तसेच दुसरे सभासद श्री पालकर हेही ह्या बाबतीत अत्यंत अभ्यासू आहेत. सर्व सभासदांच्या दृष्टीने सर्वश्री पराडकर व पालकर हेच आमच्या असोसिएशनचे पी.पी.जी. म्हणजेच मुख्य आधारस्तंभ आहेत.

सध्या महागाईच्या काळात फॅमिली पेन्शनरांचे संपूर्ण पेन्शन पती निधनानंतर एकदम बंद होते. ह्यापुढेही त्यांना निम्म्या पेन्शनवरच भागवावे लागणार आहे. जोडीदाराच्या निधनाचा मानसिक धक्का फॅमिली पेन्शनरास असतोच त्याचबरोबर ६-६ महिने पेन्शन पूर्णपणे बंद राहिल्यास त्याचा आर्थिक ताण कुटुंबावरच पडतो. बँकेत जाण्याचाही प्रसंग क्वचित आणि आता तर ही सर्व नवीन परिस्थिती. ह्याशिवाय सामाजिक परिस्थितीमुळे मुले वेगळी व घरात दोघेच. वय ६०-६५ च्या पुढे म्हणून शारीरिक दुखणी आहेतच. अशा परिस्थितीत आपलीच पेन्शन फाईल व्यवस्थित नसेल तर?

पुण्यातील एका सोसायटीतील आमच्या मित्राचे निधन झाले. वहिनी गृहिणी. घरात वरील सारखी परिस्थिती. मधय्यमवर्गीय विचार श्रेणी. त्यामुळे आमच्याकडून त्या मदत घेत नाहीत. त्यांच्या नात्यातील एका मान्यवरांनी आम्हाला प्रश्न केला, ''अहो तुमची बँक सर्वात मोठी अग्रगण्य व श्रीमंत आहे. तिच्या पतीला तुमचीच बँक पेन्शन देत होतीच. तिलाही फॅमिली पेन्शन मिळणार आहेच. सर्व रेकॉर्ड बँकेकडेच आहे. मग ६-६ महिने असा विलंब का? पेन्शन प्रो-रेटा बेसिसवर ताबडतोब सुरू करण्यास काय हरकत आहे? अर्थात ह्या प्रश्नाचे उत्तर आमच्याकडे नव्हते.

माझ्याही मते पेन्शनरचा फॅमिली पेन्शन ॲडव्हाईस पेन्शन बरोबरच मंजूर होऊन येत असतो. आता तर (व्शीॉळीशव) वाढीव पेन्शन मंजुरीचा ॲडव्हाईसही प्रत्येकास आलेला आहे. पेन्शनर्सच्या निधनानंतर तो परत मंजुरीसाठी पाठविण्याचा उद्देश काय आहे हे कळत नाही. मृत्यूचा दाखला बँकेस सादर केल्यानंतर शाखाधिकाऱ्यांना पी.पी.जीने मंजूर केलेले पेन्शन सस्पेन्स अकाऊंटला डेबीट टाकून पेन्शन देण्यास काहीच हरकत नाही.

आपली असोसिएशन असे प्रश्न सोडवत आहेच. त्याचबरोबर हेही सांगावेसे वाटते की, आपण व्यवस्थित राहा. तब्येतीची काळजी घ्या. पेन्शन फाईल कव्हर बॅगमध्ये जपून ठेवा. सतत असोसिएशनच्या संपर्कात राहा. आपले प्रश्न मांडा. असोसिएशन सदैव आपल्या मदतीस आहे.

**- शरद शिंगवेकर,** पुणे, भ्रमणध्वनी - ९४०५०२६४१२

# संपदा - मानवतेची

आळस हा माणसाचा सर्वात मोठा शत्रू. माझी मात्र त्याच्याशी चांगलीच गट्टी. कोणत्याही गोष्टीच्या नमनाला (न-मनाला) मी घडाभर तेल वापरत असते. संपदा वागळेच्या परिस स्पर्शाने थोडा वेळ का होईना ह्या मनाला मी सुट्टी द्यायला सुरुवात केली. संपदाचं व्यक्तीमत्त्वच तसं आहे. सुप्रसिद्ध वर्तमान पत्रातून जिची ओळख घराघरात पोहोचली आहे ती संपदा वागळे. तिच्या बुद्धीची झलक आपण वाचतो, अनुभवतो पण तिचे इतरही अनेक पैलू आहेत. अतिशय भावस प्रेमळ अशी व्यक्ती.

आपल्या आजूबाजूचं दु:ख बघून आपल्या डोळ्यात पाणी येतं. मन हेलावतं, तेवढं संवेदनाशील ते नक्कीच आहे, पण क्षणभरच. दुसऱ्या क्षणी ते दूर पळायला लागतं. समाजात, काही व्यक्ती मात्र त्यांचे अश्रू पुसायचा आपल्या परीने प्रयत्न करीत असतात. संपदा ही त्यातली एक. तिच्या हळव्या मनाचा कोपरा लगेचच त्या व्यक्तीच्या मदतीसाठी सर्व वाटांचा धांडोळा घ्यायला लागतो. मग ती शारीरिक मदत असो, आर्थिक असो किंवा भावनिक असो ती तेथे दत्त म्हणून हजर. तिचा हात हा नुसताच मदतीसाठी पुढे केलेला हात नव्हे तर तो एक आश्वासक, भक्कम आधार असतो.

संपदा आम्हाला मैत्रिण म्हणून लाभली हे आमचं भाग्यच. ह्याचं श्रेय आमच्या स्टेट बँकेला. बँकेने आम्हाला भरपूर वर्ष ठाणे शहरातच ठेवलं. बँकेत असतानाही ती घरची व ऑफिसची जबाबदारी अगदी सहज सांभाळत असे. ग्राहक राजाला खूश करणं हे तिचं ब्रीदवाक्य. त्यासाठी ती अगदी शाखा व्यवस्थापकांनाही साकडं घालणार. अर्थात बँकेनेही त्याची दखल घेतलीच. 'ग्राहकसेवा व डिपॉझिट मोबीलायझेशन साठी १९९६ साली बँकेकडून तिला ढाल व सन्मानपत्र मिळाले. ह्याचं श्रेय ती आपल्या सहकाऱ्यांना देते, बँकेत नोकरी करता करता स्थानीय लोकाधिकार समितीच्या माध्यमातून ती काही उपक्रम करत असे. आपल्याबरोबर सर्वांना घेऊन कधी ती अंध मुलांच्या शाळेत जाई. तर कधी अपंग मुलांच्या शाळेत जाई किंवा वृद्धाश्रमात जाऊन दिवाळी साजरी करत असे.

समाजकल्याणासाठी खारीचा वाटा उचलताना स्वेच्छा निवृत्तीची चालून आलेली संधी तिने सोडली असती तरच नवल. अर्थार्जनाचे सर्व आकडे स्पष्ट झाल्यावर तिने निर्णय तर घेतलाच, त्याचबरोबर पुढे काय हा प्रश्नही चुटकीसारखा सोडवला. लगेचच सौ. विदुला ठुसे व माधुरी कर्णिक ह्यांच्या मदतीने ठाण्यात प्रथम 'आचार्य अत्रे कट्टा' सुरू केला. गेली अकरा वर्षे तो अव्याहत सुरू आहे, बहरत आहे. हा कट्टा म्हणजे सर्वांचं एक कुटुंबच झालं आहे. त्या कुटुंबाचा सर्वसमावेशक असा दुवाही तीच आहे.

कट्टा बहरत असतानाच तिचे अनेक लेख आपण 'लोकसत्ता', 'महाराष्ट्र टाईम्स' सकाळ मध्ये वाचलेच. ओघवती, सहज सुलभ भाषा, कोणतीही व्यक्ती, संस्था अगर पर्यटन स्थळ असो त्यातील चांगल्या गोष्टी ती टिपकागदासारख्या टिपते आणि तिची लेखणी लिहायला सरसावते.

लिखाणाबरोबरच तिचं वक्तृत्वही खूप हलकं फुलकं आहे. 'किक' म्हणजे किस्से व कविता ह्या तिच्या कार्यक्रमांतून ती जुन्या-नव्या कविता नात्यात गुंफून श्रोत्यांना खिळवून ठेवते. तर 'सहजीवन' ह्या कार्यक्रमातून अनेक हृदयंगम किस्से सांगत श्रोत्यांना हसवते, तर कधी अंतर्मुख करते. तिच्या ह्या कार्यक्रमांचे आजवर १००-१२५ च्या वर प्रयोग झाले आहेत. हे सर्व करत असतानाच कधी ती मुलांचे संस्कारवर्ग घेते, तर कधी गंमतशाळा घेऊन स्वत: लहान मूल होते. शिवाय मोठ्या बायकांचे छोटेसे नाटक किंवा पथनाट्य बसवून आपल्या बरोबर सर्वांना सामावून घेते.

आपल्या अवतीभोवतीची माणसं हाच तिचा देव आहे. म्हणूनच तिच्या स्वत:च्या आयुष्यातलं पती निधनाचं मोठं दु:खं तिने मनाच्या कोपऱ्यात ठेवलं आहे. दुर्धर आजारातून त्यांना बाहेर काढण्यासाठी ह्या आधुनिक सावित्रीने अथक प्रयत्न केले. त्यांचा आजार सुसह्य कसा होईल ते जास्तीत जास्त दिवस आपल्यात कसे राहतील ह्यासाठी अनेक डॉक्टरांचे दरवाजे ठोठावले आणि त्यांचं आयुष्य दोन वर्षांनी वाढलं व त्या काळातच त्यांच्या मुलाचं व मुलीचं लग्न त्यांना बघायला मिळालं, म्हणूनच भरल्या मनाने ते देवाघरी गेले. ह्या तिच्या धडपडीत तिचा भाऊ व बहीण ह्यांची मोलाची साथ मिळाली हे ती आवर्जून सांगते. शिवाय शीला वागळे सारख्या असंख्य मैत्रिणी होत्याच.

हा सर्व आघात सहन करून लगेचच ती आपल्या कार्यात मग्न झाली. आपल्या पतीची अधुरी राहिलेली इच्छा तिने पूर्ण केली. रोह्यापासून ७-८ कि.मी. अंतरावर असलेल्या धामणसई गावात त्यांचं ८-१० खोल्यांचं वडिलोपार्जित घर होतं. त्या पंचक्रोशीत शाळा नव्हती. ह्या दोघांनीही ते घर शाळेला बक्षीस म्हणून दिलं. शाळेत सर्व सोयी उपलब्ध व्हाव्यात म्हणून खूप खटपट केली. ह्यात तिची मुलगी, जावई, सून, मुलगा ह्यांनी मोलाचं सहकार्य केलं. आता ह्या 'रामचंद्र महादेव वागळे' विद्यालयात ८ वी ते १० इयत्तेत १२५ मुलं शिकत आहेत.

हा सामाजिक व बौद्धिक वारसा तिला तिच्या आई वडीलांकडून मिळाला आहे. आई शिक्षिका-विद्यार्थ्यांना सर्व अडचणीत मदत

करत अनेकांचं जीवन तिने घडवलं आहे. म्हणूनच तिने लिहिलेल्या लेखामुळे एखाद्या संस्थेला आर्थिक मदत मिळाली तर ती लेखाची खरी पावती आहे असं ती म्हणते.

ह्या सर्वांची समाजाने दिलेली दाद म्हणजे तिला २००९ मध्ये 'आदित्य प्रतिष्ठान' ठाणे तर्फे 'नवदुर्गा पुरस्कार' मिळाला आहे. तसंच पर्यावरण मंच तर्फे 'वसुंधरा पुरस्कार' मिळाला आहे. शिवाय २०११ मध्ये म. टा. सन्मान ह्या मान्यताप्राप्त पुरस्कारांसाठी जज्ज म्हणून तिची निवड झाली होती. इतकंच नव्हे २०१२ च्या ठाणे महानगर पालिकेने काढलेल्या 'माझे ठाणे' ह्या डायरीत अनेक मान्यवरांबरोबर तिला स्थान मिळालं आहे. ह्या सर्वातून तसेच तिच्या कार्यक्रमांतून मिळालेल्या मानधनाचा उपयोग ती गरजू लोकांसाठी करत असते.

खरंच प्रेमाची, करुणेची, ममतेची संपदा तिच्याकडे भरपूरच. व्यक्तीतील गुण हेरणं, वेळ आलीच तर स्वत:कडे कमीपणा घेणं ह्या गुणांनीच ती आपलं बळ वाढवत आहे. देवाने मनाच्या संपदेचं हे दान तिच्या पदरी भरभरून टाकलं आहे. ती आपल्या कृतीने ते शतगुणीत करत आहे. षठ्यब्दीकडे वाटचाल सुरू असलेल्या तिला ही समाजोपयोगी वाटचाल अशीच सुरू ठेवण्यासाठी शताब्दी लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

– **सौ. सुलभा आरोसकर**, ठाणे
भ्रमणध्वनी – ९९६७१७९८७०

## प्रतिक्रिया

सप्टेंबर २०१२ संपादकीय मधील सभासदांनी समाजाभिमुख होऊन आपल्या अनुभवाचा फायदा नवीन पिढीला द्यावा ही सूचना अनुकरणीय वाटली. स्पर्धेतील बक्षिसपात्र लेख छान आहेत. अनुभव संपन्नता हे त्यांचे खास लक्षण जाणवले. दोन्ही लेखकांचे अभिनंदन. श्री सावरकरांची 'तारुण्य' कविता आकर्षक वाटली. श्री श्रीधर सहस्रबुद्धेंच्या 'दोन्ही शकुंतला' मनास भावल्या. मोठ्या व्यक्तिमत्त्वांचा वेध घेण्याची त्यांची कला कौतुकास्पद आहे.

– **गोविंद करमरकर**, सांगली

****

आपल्या गृहपत्रिका 'संवाद' जुलै २०१२ मधील श्री. आठवले यांनी संपादकीयमधून सर्व सभासदांना उद्देशून व्यक्त केलेले विचार सर्वांनी लक्षात घेतले पाहिजेत. निसर्गाप्रतीचं वर्तन सुधारण्याचे त्यांनी आवाहन केले आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

– **बाळासाहेब कुलकर्णी**, अहमदनगर

## शूर सैनिक मी देशाचा

शूर सैनिक मी देशाचा
शिर तळहाती घेतो
देशाकरिता लढतो आणि
देशाकरिता मरतो ।।धृ।।

हिमवर्षा असो वा वादळवारे
रात्रंदिन देतो जागते पहारे
मनसुबे शत्रूंचे उधळतो ।।१।।

होता शत्रूंचे आक्रमण
पेरतो सीमेवरी अग्नीबाण
कर्तव्य निजहृदयी कोरतो ।।२।।

सिंहगर्जना वीर तानाजीची
जागविते प्रेरणा जिंकण्याची
रणांगणी शत्रूस लोळवितो ।।३।।

प्रहार छातीवरी झेलतो
अभिषेक रक्ताचा करतो
शान तिरंग्याची वाढवितो ।।४।।

लढता लढता विपरीत घडते
समाधान कर्तव्यपूर्तीचे मिळते
बलीदान बाजीप्रभूचे आठवितो ।।५।।

कुशीत मातेच्या आज घेतो विसावा
लढेल देशासाठी उद्या माझा छावा
इतिहास सुवर्णाक्षरे मी लिहितो ।।६।।
देशाकरिता लढतो आणि
देशाकरिता मरतो

– **पुंडलिक भेंडे,** पुसद
भ्रमणध्वनी – ९५५२२९२९०१

# पुस्तक परिचय

## श्रीमत् गुरुचरित्र एक उत्कंठावर्धक शोधयात्रा (दिव्यदर्शन)

आपले पुणे येथील एक सभासद श्री. सुहास गोविंद नाईक हे मार्च २००० मध्ये सेवा निवृत्त झाले. त्यांचे 'श्रीमत् गुरुचरित्र एक उत्कंठावर्धक शोधयात्रा' हे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.

घरातील आध्यात्मिक वातावरण अनेक पारमार्थिक अधिकारी व्यक्ती, साधुसंत ह्यांना भेटण्याची ओढ, अनेक धार्मिक ग्रंथाचे वाचन, नामस्मरणाची आवड व त्यांच्या गुरुची प्रेरणा, ह्यामुळेच त्यांना गुरुचरित्रावरील उत्कंठावर्धक शोधयात्रा हा ग्रंथ लिहिण्याची प्रेरणा मिळाली.

दत्तसंप्रदायातील बहुतेक लोकांनी गुरुचरित्राची पारायणे केलेली असतील. त्यातील कथेचा अर्थ सर्वांना माहीत असतो. परंतु प्रत्येक शब्दाला सरळ अर्थ, गुढार्थ, भावार्थ-परार्थ असे विविध अर्थ असतात. भक्ताची जशी जशी प्रगती होते तसतसे त्या शब्दामागच्या विविध अर्थाची उकल होते. श्री सुहास नाईक ह्यांनी प्रत्येक अध्ययातील कथांचा सारांश सांगून कथेचा मध्यवर्ती धागा पकडून त्या कथेतील भावार्थाची उकल सहज सरल मधुर शब्दात केली आहे. कथेमधील आध्यात्मिक भावार्थ सांगून निरुपण केले आहे. त्यामुळे भक्तांना गुरु चरित्राकडे पाहण्याची वेगळी दृष्टी प्राप्त होते. लेखकाने ह्या प्रासादिक ग्रंथावर वेगळ्या अंगाने लिहून प्रकाश टाकण्याचा विनम्र प्रयत्न केला आहे. प्रत्येक निरुपण हृदयास भिडणारे असून मनास पटते. अध्याय चारमध्ये अत्रीऋषी अन् त्यांची भार्या अनुसया यांच्या पुण्याईने दत्तात्रेय जन्माची कथा सर्वांना माहीत आहे. लेखकाने केलेले निरुपण मनाला भिडते ते असे. अनुसया हे श्रेष्ठ भक्तीचे, निष्ठेचे प्रतीक आहे. या भक्तीलादेखील सत्त्व परिक्षेला सामोरे जावे लागते. पण येथेही निष्ठेची परमसीमा सिद्ध होते. सत्त्व रज तम हे तीन गुण ब्रह्मा, विष्णू, महेश ह्यांचे अंग आहेत. जीवाच्या ठायीसुद्धा हे गुण कार्यरत असतात. त्यांना काल काम क्रोधादींचा संसर्ग होत असल्याने ते शुद्ध राहत नाहीत. ह्यामुळे जीवाचे कार्य ईश्वरी इच्छेऐवजी अहंकारातून व्यक्त होते. म्हणून साधकाने सर्वदा सावध राहून सद्गुरू आज्ञेत राहून विहीत कर्म करावे. त्याला आपलेपणाचा संग होऊ नये. आपली भक्ती श्रेष्ठ व्हावी व सद्गुरूंनी आपल्याला आपलेसे करावे याचाच अत्यंत काटेकोरपणे प्रयत्न करावा - असा भावपूर्ण गुढार्थ मनास भिडतो. प्रत्येक अध्यायातील निरुपण आचरणात कसे आणता येईल हा ह्या शोधयात्रेचा भावार्थ आहे. हा शोध यात्रा ग्रंथ गुरूचरित्राप्रमाणेच मन लावून वाचला पाहिजे. त्याचा अर्थ मन लावून समजावून घेतला पाहिजे व आचरणात आणण्याचा प्रयत्न केल्यास लेखकाने लिहिलेल्या ग्रंथाचे सार्थक झाले असे म्हणता येईल.

लेखकाला मिळालेले त्यांच्या गुरुचे मार्गदर्शन, त्यांच्या घराण्यात चालू असलेली दत्तभक्ती व त्यांची स्वत:ची कठोर साधना ह्यामुळेच शोधयात्रा हा ग्रंथ परिपूर्ण आहे असे वाटते. प्रत्येक साधकाने हा ग्रंथ संग्रही ठेवून त्याचे नित्य पारायण केल्यास लेखकाचे लिहिण्याचे सार्थक झाले असे म्हणता येईल.

संपर्क - श्री. सुहास नाईक, भ्रमणध्वनी - ९९२२०६९००२

– **श्री गणेश गुर्जर,** पुणे

# मुलगीही आधार

मुले हीच म्हातारपणाची काठी व त्यात मुलगा हे सर्वांनी गृहीत धरलेले असते. पण गेल्या २०-३० वर्षांपासून झालेल्या प्रगतीमुळे जीवनमूल्यात फरक पडला आहे. ४० वर्षांपूर्वी मुलगा व वडील यांच्यात एक पिढीचे अंतर असे. त्यामुळे विचार, वागणे व बऱ्याच बाबतीत फार फरक पडत नव्हता. त्यामुळे आई-वडील व मुले हे जुळवून घेत होते. गेल्या २० वर्षांपासून शास्त्र प्रगत झाले व प्रगती, पैसा यांची चढाओढ सुरू झाली. त्याचबरोबर आई-वडील व मुले यांच्यात तीन पिढ्यांचे अंतर आले. सर्व गोष्टीत फारच फरक झाले. त्याचबरोबर जुळवून घेण्याची वृत्ती कमी झाली. तापटपणा, मान-अपमान यांच्या कल्पना बदलल्या व संघर्ष होऊ लागले. त्यामुळे मुलांबरोबर मोठ्यांनी राहावयाचे असेल तर मोठ्यांनी संसारात विचारल्याशिवाय दखल घेऊ नये व आपला सल्ला मानलाच पाहिजे हा आग्रह सोडून द्यावा. वडिलांनी व विशेषत: माताजींनी सैंपाकघरातील लक्ष कमी करावे व विचारल्याशिवाय सल्ला देऊ नये.

मुलांबरोबर पटले नाही तर मुलगी पण म्हातारपणाची काठी होऊ शकते. याबद्दल विचार होऊ शकतो. पूर्वी आपल्या देशात वृद्ध लोक वानप्रस्थाश्रमात जायचे. हल्ली वृद्धाश्रम झालेत. त्याचप्रमाणे डे-केअर सेंटर पण उपयोगी पडतील. ज्या वृद्धांना स्वतंत्र राहावयाचे आहे व ज्यांची मुले परदेशी आहेत त्यांच्याकरिता शहराजवळ सर्व सुविधायुक्त राहण्याची सोय सर्व थरांतील लोकांना परवडतील अशी असावीत.

आजी-आजोबा घरात असतील तर नातवांची देखभाल करण्यास त्यांचा उपयोग होतो. त्याकरिता त्यांना थोडेफार स्वातंत्र्य व मान-सन्मान दिला तर ही समस्या दूर होऊ शकते. दोन्ही बाजूंनी हेकटपणा, इगो, स्टेटस् सिंबॉल या कल्पना बाजूला सारून वागावे. मुलगा हीच म्हातारपणाची काठी असे समजू नये. मुलगीसुद्धा योग्य असते किंवा मुलापेक्षा जास्त काळजी घेईल असे वाटते.

- **शामराव खंडू पोटे**, मुंबई,
भ्रमणध्वनी - ९८६९००९२२४

# पुणेरी पाट्या

१) आमचे येथे बर्गर व पिझ्झा मिळतील तसेच बाहेरील खाद्यपदार्थास एक रुपयात सॉस लावून मिळेल.

२) या शाखेचे मालक येथेच जेवतात (मालकांच्या वजनाची चौकशी करू नये)

३) दोन माणसात तोंड पुसायचे तीन कागद मिळतील. नंतर जादा आकार पडेल.

४) कारणाशिवाय बसू नये. कारण काढूनही बसू नये. फक्त खाण्यासाठी बसण्याची सोय.

५) टी.व्ही. चालू ठेवायचा की नाही हा व्यवस्थापनाचा निर्णय आहे तरी बंद टी.व्ही. चा आरशासारखा उपयोग करू नये. केस वगैरे विंचरू नयेत.

६) टी.व्ही. चालू असेल तरीही फार पाहात बसू नये. हे खाद्यगृह आहे. प्रेक्षागृह नव्हे.

७) कृपया फ्रेंच फ्राईड मोजून घ्यावेत. नंतर तक्रार चालणार नाही.

८) गिऱ्हाईकांचा संतोष हेच आमचे ध्येय.
(व्यवसायाच्या वेळा सका. ११ ते ४, दुपा. ४ ते ८ तक्रारीची वेळ ११ ते ११.०५)

९) पहिल्या दहा मिनिटात ऑर्डर मिळाली नाहीतर पुढच्या १० मिनिटात मिळेल पैसे परत मिळणार नाहीत.

१०) कृपया 'ड्राइव्हथ्रू'च्या खिडकीवरील मुलींशी गप्पा मारू नये.

११) विनाकारण सॉस मागू नये. टोमॅटो फुकट येत नाहीत.

१२) शितपेयाच्या ग्लासच्या झाकणास भोक पाडलेले नाही. तर चोख नळी (स्ट्रॉ) साठी पाडलेले आहे. बदलून मिळणार नाही.

१३) उरलेले अन्न नेण्यासाठी घरून डबा आणावा. कागदी वा प्लॅस्टिक पिशवी मिळणार नाही.

१४) आमच्या कोठेही शाखा आहेत. इतर शाखेच्या तक्रारी/ कौतुक येथे सांगू नये.

१५) शितपेय संपल्यावर ग्लास टाकून द्यावा. चोखनळीने विचित्र आवाज करीत बसू नये.

**- नी. व. ओढेकर,** नासिक

# बा पेन्शनरा....

पेन्शन सेंट्रलायझेशनचा
फंडा जन्माला आला
पेन्शनराचा जीव मात्र
आता कासावीस झाला ।।१।।

पेन्शन रेकॉर्ड गेले कोलकाताशी
निर्णय झाला एका सहीनिशी ।
रेकॉर्ड आमच्याकडे नाही बोलले
पी.पी.जीने हात कानावर ठेवले ।।२।।

ब्रँचला पेन्शन विषयी माहिती नाही
डीजीएम/एजीएम पेन्शन देण्याचे अधिकार नाहीत
कुठल्याही लेव्हलवर जबाबदार अधिकारी नाहीत
पेन्शनरांनी न्याय कुठे मागायचा माहीत नाही ।।३।।

पेन्शनरांनो, फॅमिली पेन्शनरांनो
बीना-पेन्शन नुसते हेलपाटे मारा
पुंजी तुमची संपवून टाका
सर्व पर्याय तुम्हीच शोधा ।।४।।

कॉम्प्युटरच्या जगात आम्ही
क्षणात जग धावते कोठेही
अहो पण कॉम्प्युटर निर्णय देत नाही
बुद्धीचा निर्णय मार्गी लागत नाही ।।५।।

कर्जे मंजुर होतात आपल्या गावी
पण पेन्शन मंजुरी गेली कोलकात्याशी
तुघलकी निर्णय सेंट्रल ऑफिसने घेतला
पेन्शनरांचा जीव मात्र टांगणीला ।।६।।

स्वर्गस्थ पेन्शनरांची इच्छा अपुरी
माझ्या कुटुंबियांना पेन्शन मिळेल की नाही
आजचे सुपातले ऑफिसर
उद्या जात्यात असतील
तेव्हा कळेल त्यांना आपली किंमत शून्यसुद्धा नाही ।।७।।

**- शरद शिंगवेकर,** पुणे
भ्रमणध्वनी - ९४०५०२६४१२

# मत प्रदर्शन करताना जरा जपूनच....

बरेच वेळा आपण एखाद्या व्यक्तीबद्दल अनवधानाने तर कधी समोरच्या व्यक्तिकडून अपेक्षित उत्तर न आल्यामुळे जराशा रागानेच मत प्रदर्शित करतो. त्या वेळेस आजूबाजूच्या परिस्थितीकडे बघण्याचे भान आपल्याला राहत नाही त्यामुळे कधी कधी खजील होण्याचा प्रसंग आपल्यावर येतो. ह्याचा अनुभव मी २ वर्षापूर्वी घेतला.

दक्षिणेकडील एका प्रसिद्ध तीर्थक्षेत्री जाण्याचा बेत आम्ही कुटुंबियांनी आखला. तेथील श्री. साठे गुरुजींकडे राहण्याची व जेवणाची चांगली सोय होते असे एका नातेवाईकांकडून कळले. त्याप्रमाणे श्री. साठे गुरुजींना पत्र पाठवून विचारणा केली. त्यांच्याकडून उत्तर न आल्यामुळे फोनवर बोलणेपण झाले. हल्ली त्या सुविधा त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत परंतु दुसरीकडे म्हणजे हॉटेलमध्ये जागा मिळू शकेल असे त्यांनी सांगितले व तेथे पोहचल्यावर संपर्क करायला सांगितले.

आम्ही तेथे पोहचल्यावर देवळाजवळच मोठ्या प्रयासाने १-१ा तासाने एका धर्मशाळेत आम्हाला बऱ्यापैकी एक खोली मिळाली. आंघोळी वगैरे आटपून आम्ही बाहेर पडलो तेव्हा काऊंटरवरच एका महाराष्ट्रीयन पर्यटकाने तेथे श्री. दाते गुरुजीपण पूजा सांगतात असे सांगितले. श्री.साठे गुरुजींना अजिबात वेळ नसतो असे पण कळल्यामुळे आम्ही सरळ देवळात पोहोचलो आणि बघितलं तर प्रचंड गर्दी. दरवाज्याजवळील एका फुले विकणाऱ्या दुकानाजवळ एक गुरुजी उभे होते. त्यांना मी विचारले, ''दाते गुरुजी मंदिरमें हैं क्या?' त्यावर त्यांनी दिलेले उत्तर 'झरुर-झरुर' माझ्या पचनी पडले नाही. कारण ते दोन शब्द म्हणजे तमिळ व हिंदी दोन्ही भाषांचा मिलाफ होता. मी परत त्यांना 'दाते गुरुजी मंदिर में है क्या?'' असे विचारले. त्यांनी परत त्याच भाषेत जरा वरच्याच पट्टीत पुन्हा तेच शब्द उच्चारलेत व रागानेच मला म्हणाले, ''हिंदी समझता नहीं क्या?' व पुढे चालू लागले. सौ. ला त्यांना पूजेबद्दल काही विचारायचे होते म्हणून ती त्यांना गाठण्याचा प्रयत्न करू लागली. गृहस्थांच्या एकूण वागणुकीमुळे व चेहऱ्यावरील करारी मुद्रेमुळे मी पण वैतागून हिला म्हणालो, ''काही विचारू नकोस त्यांना! विक्षिप्त गृहस्थ दिसताहेत ते!'' कारण मला त्यांच्याकडून उत्तर अपेक्षित होते ते म्हणजे 'हाँ किंवा नहीं' त्यांचे झरुर-झरुर' हे हिंदी-तमिळ मिश्रीत शब्द व कळल्यामुळे मला त्यांना परत विचारावे लागले होते व त्यामुळे त्यांचा पारा चढला होता. मी व्यक्त केलेला शेरा त्यांनी ऐकला व एक जळजळीत कटाक्ष टाकून ते पुढे गेले.

दुपारचे जेवण व विश्रांती झाल्यावर मी ठरल्याप्रमाणे श्री. साठे गुरुजींना फोन करून आम्ही पोहोचल्याचे सांगितले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही संध्याकाळी ५ वाजता त्यांच्या घरी पोहोचलो. त्यांच्या कॉलेजमधील मुलीने आमचे स्वागत करून शेजारच्या खोलीत बसविले व बाबांना आम्ही आल्याची वर्दी दिली. काही क्षणातच साठे गुरुजींनी खोलीत प्रवेश केला आणि त्यांना बघताच मी व सौ. ने एकमेकांना सकाळी त्या गृहस्थानी (गुरुजींनी) टाकलेला कटाक्ष आता लक्षात आल्याचे नजरेनेच खुणावले.

चहापान झालं. गप्पा मारताना 'साठे गुरुजी' ''सकाळी माझ्याजवळ कोणीतरी दाते गुरुजींची चौकशी करत होतं'' हे नमूद करायला विसरले नाहीत. आता मात्र येथे 'तो मी नव्हेच' असं म्हणून हात वर करायला जागा नव्हती. कारण सूर्य व जयद्रथ समोरासमोरच होते. कुठलीही अढी मनात न ठेवता गुरुजींनी आम्हाला रात्री ८ वा. संपूर्ण मंदिर व परिसर व्यवस्थितपणे माहिती देऊन दाखविले. 'झालं गेलं विसरून जा' असे मनात म्हणत त्यांना पुण्याला यायचं आमंत्रण दिले. मनाशी खूणगाठ बांधतच त्यांचा निरोप घेतला की कितीही राग आला किंवा मनाविरुद्ध झालं तरी मत प्रदर्शन करताना जरा जपूनच....

(गुरुजींची नावे बदलली आहेत)

- **विजय वैद्य**, पुणे

भ्रमणध्वनी - ९८८१३४४४९८

## दान

दानातही विविधता दिसे या जीवनी
अन्नदान हे करिती पुण्य मिळविण्या कोणी ।।१।।

सुख प्राप्तीसाठी कुणी अर्पिती प्रभूस मणी कांचन
वाटून जे वाढते असे कोणी करे ज्ञानदान ।।२।।

सुखी करण्या इतरांना दुःख कुणी सोसती
रक्तदान हे करूनी रुग्णांचे प्राण वाचविती ।।३।।

ऐहिक जीवन जगता हे सर्व असे यथार्थ
मरणोत्तर नेत्रदान हे करूनी होऊ या कृतार्थ ।।४।।

- **गोपाळ वि. मुळे,** पुणे

भ्रमणध्वनी - ९८९०८६३८६९

# आपण काय विसरलो

१) बैठकीत टी. व्ही आल्यामुळे **बोलणे** विसरलो.
२) दारात गाडी आल्यामुळे **चालणे** विसरलो.
३) कॅलक्युलेटर आल्यामुळे **पाढे** विसरलो.
४) एअर कंडिशनमुळे झाडाचा **गारवा** विसरलो.
५) कचकड्याची नाती जपताना **खरे प्रेम** विसरलो.
६) बँकेतील खाती सांभाळताना पैशाची **किंमत** विसरलो.
७) कृत्रिम सेंटच्या वासामुळे फुलांचा **सुगंध** विसरलो.
८) पॉप संगिताच्या कल्लोळात **संगीत समाधी** विसरलो.
९) मृगजळामागे धावताना सत्-कर्माचा **आनंद** विसरलो.
१०) स्वत:चीच तुंबडी भरताना इतरांचा **विचार** विसरलो.
११) आजचे विनोद कृत्रिम म्हणून खळखळून **हसणं** विसरलो.
१२) हसणं विसरल्यामुळे **खरे जीवन** जगणेच विसरलो.

**- सौ. नेत्रा काकडे,** अकोला (विदर्भ)

# घर

घर असावे सुंदर
देवदेवतांचे जणू मंदिर
सुख समृद्धीने भरपूर असावे
कुटुंबाचे आरोग्य तिथे नांदावे
देवाजवळ दिव्याचा मंद प्रकाश असावा
अगरबत्तीचा सुवास तिथे दरवळावा
घरात शिस्तीला जागा मिळावी
त्याग, उपकाराची भावना असावी
स्वावलंबनाचा तिथे अवलंब व्हावा
कष्टांना, प्रतिष्ठेला मान मिळावा
घरात सर्वांना आपले मत असावे
मिळून सर्वांनी एकमत व्हावे
अंगणात डौलाने तुळस डौलावी
नित्यनेमाने तिची पूजा करावी
घरची लक्ष्मी प्रेमळ असावी
सासर-माहेरची मने तिने जिंकावी
पित्याने घरचे घरपण राखावे
त्यांच्या सावलीत कुटुंब वाढावे
घराचा दरवाजा हळूच उघडावा
घरामध्ये स्वर्गसुखाचा आभास व्हावा

**- सौ. संध्या प्रितम परदेशी,** औरंगाबाद
भ्रमणध्वनी - ९३२५२१८१२२

# स्मृती

काही स्मृती बकुळगंधी
हव्याहव्याशा वाटतात
थोड्याशाही अस्तित्वाने
सुख अद्याप उधळतात
काही काही असतात मात्र
काटेरी अन् जहाल
सलत राहतात, खुपत राहतात
करतात मन रक्तबंबाळ
काही स्मृती स्वप्निल अशा
भावतरल होतात
मनाच्या पृष्ठभागी
सततच तरंगतात
शिंपल्यामधील मोत्यांसारख्या
लपतात काही स्मृती
शोधल्या तरी प्रयासानेच
नीट येतात हाती
काही मात्र नको त्याच
कधीच नाही बुडत
स्वयंभू झाल्यासारख्या
राहतात वर वर उसळत
काही स्मृती कातरवेळी
मनी हुरहूर लावतात
विरहाची प्रीतीची
विफल गीते गातात
हव्या त्याच स्मृती कशा
विस्मृतीत दडतात
नको असतील तेव्हा मात्र
सारख्या छळत राहतात

- सौ. उज्वल र. ब्रह्मांडकर

## *बाळ माझे दूरदेशी*

दूध पाजू की दुपटे बदलू आधी
जागवते बाळ रात्रभर अधिमधी

चालायला लागले आता पडेल म्हणून भीती
आजारपणात तर उरी भीतीच भीती

चिंता मनी सतत डब्यात दिलेल्या खाऊची
खेळात, अभ्यासात प्रगती असेल का माऊची

तसदी नाचगाणे, पोहणे साऱ्यात पुढे येण्याची
बरोबरीने सारी काळजी बाळाच्या सुदृढतेची

कसोशीने सारे पाळता, परीक्षा आली दहावीची
साऱ्या घरादारालाच हवी झाली खात्री यशाची

महाविद्यालय गाठता बाळ ऐकेना झाले तनही
हळूच म्हणाले एके दिवशी ''आम्ही प्रेम करतो आई''

बघता बघता दोघे पोहचले विदेशी
आठवड्यासाठी येऊन करून गेले लग्न स्वदेशी
आम्ही मात्र पाहात राहिलो कावड आमची दूरदेशी

– सौ. साधना अजित धारवाडकर
भ्रमणध्वनी – ९३२२७९६६९१

## *असे का होते?*

पूर्वी रेल्वे-स्टेशनवर गाडी शिरल्या शिरल्या
उडी मारून विंडो सीट पकडणारे आम्ही
आताशी चौथ्या सीटलाही का मुकलो आहोत?
खरंच! अवलोकन करण्याची वेळ आली आहे

पूर्वी मैलोनमैल वॉक घेणारे आम्ही
आताशी चार पावले चालल्यावर का दमतो?
आमच्या पायावर तर, आमचा पूर्ण भरवसा आहे
आजचे रस्तेच त्याला कारणीभूत आहेत

पूर्वी सारखे लख्ख दिसणारे ते आरसे
हल्ली बाजारात का मिळेनासे झाले आहेत?
जेव्हा आमचा चेहरा आम्ही आरशात पाहतो
तेव्हा पूर्वी सारखा टवटवीत दिसत नाहीये

आम्ही विश्वास ठेवण्यास तयार नाही
म्हणे, वयोमानानुसार यादगार कमी होते?
आम्ही आठवणीने वस्तू जागच्या जागी ठेवतो
नेमकी ती जागाच आम्हाला सापडत नाही!

**– माधव वि. नाडकर्णी,** मुंबई
भ्रमणध्वनी – ९८१९०८४३८०

## मी अन् ही

तू ये केव्हाही, घरीच असतो मी
दिवसा अन् रात्री खेळ असतो चालूच
माझा एक पात्री
कधीच नव्हती केली आम्ही पत्रापत्री
आताच येईल कशी मग भेटीची स्फूर्ती?
मित्र येणार नाहीये ही मला खात्री
विरत गेलेली मैत्री
दिसलीयं त्याच्या नेत्री
उलट अगदी ही अन् तिच्या मैत्रिणी
फेसबुकवरूनही किती
पुनर्जन्मवल्यात त्यांनी
जुन्या, नव्या ओळखी
भाव विश्वात रमुनी
'गेट टु गेदर्सना' जमुनी
मज करताहेत साऱ्याजणी
मुलेबिलेही त्यांची
जमवताहेत बिनधास्तपणी
जाणी अन् येणी
झालेयं घर विश्वचि
त्या ई मेलवाल्यांसाठी
मी खंतावतोय एकलेपणी
ठरलोय न संगणक अडाणी!

**– कल्पना सुभाष कोठारे, सांताक्रुझ**
दूरध्वनी – २६१०४५५२

## शब्दांच्या पलीकडे

दिवस शब्द उच्चारला की पाठोपाठ रात्र येते
जीवन म्हटलं की पाठोपाठ मरण येते
होकार दिला की मागे नकार असतो
देव म्हटला की मागे दैत्य आलेच
पुरुष म्हटला की मागे स्त्री आलीच
आनंद म्हटला की मागे दु:ख आलंच
पण हे सारे शब्दांचेच उच्चार, विचार
शब्द आहे तोवर हे सारंच राहणार
पण शेवटी शब्दांनाही असते मर्यादा
शब्दांच्या पलीकडेच आहे सारं अमर्याद
म्हणूनच यावं आणि जावं शब्दांच्या पलीकडे
तिथे असतं फक्त चैतन्य आणि चैतन्यच!
ते अनुभवायला लागतो अंतरीचा नि:स्वार्थ भाव
आणि मगच म्हणावं मनातून 'देवा मला पाव'!

**– सतीश केतकर,** कल्याण भ्रमणध्वनी ९७६९५६२३१०

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession Register No. PNCW/M-144/2011-2013 Dated 10.12.2010
Permission to Post without Prepayment No.: WPP-217 at Market Yard P.S.O. on 25th of each Month

## माणुसकी

माणसाला माणूस हवं असतं
तेच जगण्याचं गमक असतं ।।१।।

सुख दु:ख सर्वांचे सारखंच असतं
प्रसंगोचित वाटून घ्यायचं असतं ।।२।।

कोणी-कुणाला छोटं-मोठं समजायचं नसतं
माणुसकीचं नातं भान टिकवायचं असतं ।।३।।

जगात एकट्यानेच यायचं असतं
अंत्यसमयी एकट्यानेच जायचं असतं ।।४।।

निरोपासाठी चारजण असणं गरजेचं असतं
हेच माणुसकीचं नातं असतं ।।५।।

सत्य कळतं पण वळत नसतं
म्हणून माणसा! लक्षात ठेव
माणसाला माणूस हवं असतं ।।६।।

**- प्रभाकर कानिटकर**, कोल्हापूर
भ्रमणध्वनी - ९८८११९९१९९

## सर श्रावणाची

सर श्रावणातील ती पावसाची
सारा आसमंत भिजवूनी गेली
माळरानातील पाऊलवाटेवर
थेंब सुखाचे, सांडुनी गेली

हिरव्या कोवळ्या वनश्रीमधुनी
खट्याळ वारे खेळत होते
कोवळ्या माडांच्या झावळ्यांना
हळुवार चुम्बुनी आले होते

ती काळी सावळी मेघमाला
क्षितिजावरील पाण्यात डुंबत होती
मर्दानी सागराच्या मिठीमध्ये ती
गुदमरुनी जणू गेली होती

**- दिलीप अ. रेडकर**
गोरेगाव (प) मुंबई

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.